Prabhu Shri Ramchandra Shikshan Prasarak Mandal Tondgaon's

Affiliated with Sant Gadge Baba Amravati University, Amravati

Matoshri Shantabai Gote Arts, Commerce & Science College Washim

Department of Philosophy

Award for Best Book of faculty

Nature of Award : State Level

Award Name : Sonopant Dandekar Best Book Award

Reciving Date : 17/07/2023

Award Latter

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

४९६ सदाशिव पेठ, टिळक रस्ता, पुणे -४११०३० ■ दूरध्वनी : (०२०) २४४७५९६३
वेबसाइट : www.masapapune.org ■ ई-पत्र : masaparishad@gmail.com

महाराष्ट्र साहित्य परिषद
स्थापना : २७ मे १९०६
नोंदणी क्र. : एफ ९०

विश्वस्त मंडळ :
डॉ. शिवाजीराव कदम (अध्यक्ष)
डॉ. पी. डी. पाटील (कार्यकारी विश्वस्त)
श्री. यशवंतराव गडाख (सदस्य)

अध्यक्ष :
डॉ. रावसाहेब कसबे

उपाध्यक्ष :
श्री. विद्याधर अनास्कर
डॉ. तानाजीराव चोरगे
श्री. राजीव बर्वे

कार्याध्यक्ष :
प्रा. मिलिंद जोशी
९८५०२७०८२३

प्रमुख कार्यवाह :
प्रकाश पायगुडे
९४२२०१२०२४
७९७२८९६९७९

कोषाध्यक्ष :
सुनिताराजे पवार
९८२३०६८२९२

पत्रिका संपादक :
डॉ. पुरुषोत्तम काळे
९४०४९३७७१०

कार्यवाह :
दीपक करंदीकर
बंडा जोशी
उद्धव कानडे
माधव राजगुरू
वि. दा. पिंगळे
ॲड. प्रमोद आडकर

विभागीय कार्यवाह :
पद्माकर शिरवाडकर (ठाणे)
राजन मुठाणे (कोल्हापूर)

जा. क्र. १७/२३-२४
दि. ६/७/२०२३

डॉ.वेदप्रकाश डोणगावकर
वाशिम.

यांना,

स.न.वि.वि.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीने, तत्त्वज्ञान, अध्यात्मशास्त्र, मानसशास्त्र, योग किंवा नीती या विषयांशी संबंधित उत्कृष्ट ग्रंथास **डॉ. म. वि. गोखले पुरस्कृत प्राचार्य सोनोपंत तथा मामासाहेब दांडेकर पुरस्कार** प्रतिवर्षी दिला जातो.

२०२१ च्या पुरस्कारासाठी, '**भारतीय तत्त्वज्ञान**' या आपल्या ग्रंथाची निवड करण्यात आली आहे. आपले मन:पूर्वक अभिनंदन.

हा पुरस्कार प्रदान समारंभ संतसाहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक आणि महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ.सदानंद मोरे यांच्या शुभहस्ते आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष **प्रा.मिलिंद जोशी** यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार, दिनांक १७ जुलै २०२३ रोजी सायंकाळी ५:३० वाजता, महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या माधवराव पटवर्धन सभागृहात होणार आहे. रोख रुपये ७,०००/- व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

तरी आपण या समारंभास, पुरस्कार स्वीकारण्यासाठी अवश्य उपस्थित रहावे व आपले मनोगत व्यक्त करावे, ही विनंती.

कळावे.

आपले,

उद्धव कानडे
(कार्यवाह)
मो.नं.९८९०६५२७२३

सुनिताराजे पवार
(प्रभारी प्रमुख कार्यवाह व कोषाध्यक्ष)

प्रा.मिलिंद जोशी
(कार्याध्यक्ष)

Receiving Award

News of Award

देशोन्नती

भारतीय तत्त्वज्ञान या पुस्तकाला महाराष्ट्र साहित्य परिषदेचा पुरस्कार

देशोन्नती वृत्तसंकलन...

वाशिम■ मातोश्री शांताबाई गोटे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वाशिम येथील तत्त्वज्ञान विभाग प्रमुख डॉ. वेदप्रकाश डोणगावकर यांच्या भारतीय तत्त्वज्ञान या पुस्तकाला महाराष्ट्र साहित्य परिषदेकडून २०२१ वर्षाचा प्राचार्य सोनोपंत दांडेकर उत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार देण्यात आला.

डॉ. वेदप्रकाश डोणगावकर यांनी २०२० या वर्षी भारतीय तत्त्वज्ञान या पुस्तकाचे लेखन केले होते. सदर पुस्तकाचे लेखक म्हणून १७ जुलै रोजी महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे यांच्या वतीने प्राचार्य सोनोपंत तथा मामासाहेब दांडेकर पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार संत साहित्याचे अभ्यासक तथा महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते त्यांना देण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी होते. आपल्या सत्काराला उत्तर देत डॉ. वेदप्रकाश डोणगावकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी ते म्हणाले की, भारतीय तत्त्वज्ञान हा अबोध आणि अवघड विषय असल्याचा बाऊ केला जातो. परंतु भारतीय तत्त्वज्ञाना इतके सोपे तत्त्वज्ञान दुसरे नाही. भारतीय तत्त्वज्ञानामध्ये केवळ ईश्वर, आत्मा, पुनर्जन्म याच गोष्टीचा अभ्यास केला जातो असे नाही. भारतीय तत्त्वज्ञानात मूल्य संस्कार, आत्म कल्याण, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि याचबरोबर जीवनाची व्यवस्था आखण्यासंबंधीचे विचार असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले. मागच्या काही दशकांमध्ये भारतीय तत्त्वज्ञान या विषयावर म्हणावे तसे लिखाण झाले नसल्याचे दिसून आले म्हणून आपण भारतीय तत्त्वज्ञान हे पुस्तक लिहिण्याचा प्रयत्न केला असल्याचे डॉ. डोणगावकर म्हणाले. हे पुस्तक लिहीत असताना त्यांनी वेद, उपनिषद, सूत्र ग्रंथ, त्रिपीटक, जैनांचे मूळ साहित्य, भगवद्गीता अशा मूळ आणि प्राचीन साहित्याचा अभ्यास केला. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्यावतीने प्राप्त झालेल्या या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे.

त्यांना प्राप्त झालेल्या या पुरस्काराबद्दल त्यांच्या महाविद्यालयाच्या संस्थेचे अध्यक्ष डॉ. नारायणराव गोटे, प्राचार्य व प्राध्यापक यांच्या शिवाय महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. नागोराव कुंभार, ज्येष्ठ लेखिका प्रा. माधवी कवी, ज्येष्ठ प्राध्यापक डॉ. साहेबराव नीगळ, रा. तु. म. नागपूर विद्यापीठाच्या तत्त्वज्ञान विभागाचे माजी विभाग प्रमुख डॉ. सुरेंद्र गायधने यांच्यासह तत्त्वज्ञान विषयाचे अनेक प्राध्यापक आणि तत्त्वज्ञान प्रेमी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. (ता.प्र)

Deshonnati Edition
Jul 19, 2023 Page No. 3
Powered by : eReleGo.com